सत्यमेव जयते

जनहिताय सर्वदा

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

पहिला मजला, मुख्य इमारत,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

**दुरध्वनी क्र.** (०२२) २२७९३७५४ **Email:** deske१०-rfd@mah.gov.in

क्र. पदभ -२०२५/प्र.क्र.९८/आस्था-१० दिनांक : ०१ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

विभागीय आयुक्त, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नागपूर, अमरावती.

**विषय :- महसूल सेवक (कोतवाल) पदभरती सन २०२६ बाबत.**

संदर्भ :-(१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. केओटी-२०१२/प्र.क्र.१७/ई-१०, दिनांक ०५ सप्टेंबर, २०१३.

(२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ई-१०, दिनांक १७ मे, २०२३.

(३) शासनाचे सम क्रमांकाचे पत्र दि.१९.०८.२०२६.

(४) शासनाचे सम क्रमांकाचे पत्र दि.०३.०९.२०२६, १.१०.२०२६.

(५) शासनाचे सम क्रमांकाचे पत्र दि.१.१०.२०२६.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी राज्यातील दि.३१.०५.२०२६ रोजी रिक्त असलेल्या २९१२ इतक्या महसूल सेवकांची रिक्त पदे भरण्यासाठी “एक विशेष बाब” म्हणून शासनाने मान्यता दिली आहे. तसेच संदर्भ क्र.५ अन्वये त्यानुषंगाने महसूल सेवक (कोतवाल) पदभरतीचा सुधारित कार्यक्रम कळविण्यात आलेला आहे.

तथापि, भारत निवडणूक आयोगाकडील दिनांक २२.९.२०२६ च्या प्रेस नोटद्वारे महाराष्ट्र विधान परिषदेच्या ०३ पदवीधर मतदारसंघ (औरंगाबाद विभाग, पुणे विभाग, नागपूर विभाग) व ०२ शिक्षक मतदारसंघांच्या (अमरावती विभाग व पुणे विभाग) रिक्त होणाऱ्या जागांसाठी द्विवार्षिक निवडणूक-२०२६ बाबत निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आलेला आहे व दिनांक २२.९.२०२६

पासून सदर ०३ पदवीधर व ०२ शिक्षक मतदारसंघामध्ये तात्काळ प्रभावाने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली असल्याचेही कळविले आहे.

सदर आदर्श आचार संहितेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजी नगर, पुणे, नागपूर व अमरावती या विभागांतर्गत असलेल्या जिल्ह्यांतील महसूल सेवक (कोतवाल) पदभरतीच्या कार्यवाहीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी कृपया याची नोंद घ्यावी व आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

SANJAY
RAGHUNATH
BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.10.01 21:22:23 +05'30'

**(संजय बनकर)**

**सहसचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत संग्रहार्थ- आस्था-१०